दै. पुण्यनगरी दि. 27-11-2021

# शासकीय समितीवर गोविंद जोशी

**देगलूर/ प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शिफारस करण्यासाठी शासनाने गठित केलेल्या समितीमध्ये देगलूर महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी यांचा समावेश करण्यात आला आहे. गोविंद जोशी हे महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कल्याण महासंघ शासन मान्यता प्राप्त संघटनेचे राज्य पातळीवरील पदाधिकारी आहेत.

अकृषिक विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत



शिफारस करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

यामध्ये आ. सतीश चव्हाण,आ. अभिजित वंजारी,आ. जयंत आसगावकर, आ. कपिल पाटील, आ. किरण सरनाईक, आ.दत्ता लाड, एम फुक्टो संघटनेचे सदस्य प्रा. अनिल पाटील,डॉ. गोविंद काळे, डॉ. किशोरी भगत, डॉ. विजय हिले या ३ शिक्षक प्रतिनिधींचा समावेश आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून गोविंद जोशी व महाराष्ट्र महाविद्यालयीन व विद्यापीठ सेवक संयुक्त कृती समितीचे सदस्य अजय देशमुख, नितीन कोळी,रावसाहेब त्रिभुवन,डॉ. दिनेश कांबळे, प्रवीण मस्तुद,मिलिंद भोसले यांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्य शासनाचे अवर सचिव धीरज अभंग यांनी दि. २६ नोव्हेंबर रोजी शासन निर्णयानुसार समितीचे गठन व सदस्यांची नावे कळविली आहेत. या गठीत समितीत सदस्यपदी गोविंद जोशी नळगीरकर यांचा वर्णी लागल्याने अनेकांनी कौतुक केले आहे.

Scanned with CamScanner